# सल्लागार (कामगार) कार्यालय

## केंद्रीय माहिती अधिकार २००५ कलम ४ अन्वये प्रसिध्द करावयाची माहिती

| अ.क्र | तपशिल | कार्यवाही |
|---|---|---|
| (अ) | कार्यालयातील दस्तऐवज कॅटलॉग करणे. | सल्लागार (कामगार) कार्यालयातील खालील दस्तऐवज कॅटलॉग करण्यात आली आहेत.<br>(१) वारस नियुक्ती रजिस्टर — ALSr.1<br>(२) आवक बारनिशी – ALJr1.1<br>(३) जावक बारनिशी – ALJr.1.2<br>(४) गोपनीय रजिस्टर – ALJr 1.3<br>(५) न्यायालयीन प्रकरण रजिस्टर – ALJr2.1<br>(६) डेडस्टॉक रजिस्टर – ALJr2.2<br>(७) इन्डिंमेटी बाँड रजिस्टर – ALJr2.3<br>(८) कामगार कल्याण निधी रजिस्टर – ALJr2.4<br>(९) कामगार कल्याणनिधी अकौंट रजिस्टर – ALJr2.5<br>(१०) कामगार कल्याण निधी डेथक्लेम व शिष्यवृत्ती – ALJr2.6<br>(११) पेन्शन रजिस्टर ALJr3.1<br>(१२) सेवापूर्ति समारंभ रजिस्टर ALJr3.2<br>(१३) ८५ वारस करार ALJr3.3<br>(१४) पेन्शन अदालत रजिस्टर ALJr3.4<br>(१५) सीटीडी अनामत रजिस्टर – ALJr3.5<br>(१६) सीटीडी एजंट रजिस्टर – ALJr 3.6<br>(१७) स्टेशनरी रजिस्टर – ALJr4.1<br>(१८) पे – रजिस्टर – ALJr4.2<br>(१९) गटविमा रजिस्टर – ALJr4.3<br>(२०) बोट खत – ALJr4.4<br>(२१) अनपेड रजिस्टर – ALJr4.5 |
| (ब) १. | कार्यालयाचा तपशिल, कर्तव्य व कार्य. | कार्यालयाचा तपशिल व पार पाडण्यात येणारी कार्ये खालील प्रमाणे आहे.<br>इकडील कार्यालयाकडे खालील प्रमाणे सेवक वर्ग आहे.<br>सल्लागार (कामगार) - १ वर्ग १<br>कामगार कल्याणाधिकारी - २ वर्ग २<br>सि.ग्रेड लेखनिक - २ वर्ग ३<br>लघुटंकलेखक – १ वर्ग ३<br>ज्यु.ग्रेड लेखनिक - ४ वर्ग ३<br>शिपाई - २ वर्ग ४<br>वरील सेवक वर्गाच्या मदतीने विविध विभागांशी संबंधित औद्योगिक व कामगार कायद्यातील तरतुदींबाबत अंमलबजावणी करणे व मार्गदर्शन करणे.<br>मे.औद्योगिक व कामगार न्यायालयीन प्रकरणी मार्गदर्शन करणे व समन्वय राखणे.<br>वारस पध्दतीच्या नेमणुका प्रकरणी छाननी करणे.<br>कामगार संघटने समवेत केलेल्या करारांची अंमलबजावणी करणे.<br>इन्डिंमेटी बाँड, ओव्हर टाईम प्रकरणी छाननी करणे.<br>पेन्शन व खातेनिहाय चौकशी प्रकरणी सनियंत्रण करणे व अहवाल सादर करणे व पेन्शन अदालतमध्ये दाखल निवेदनांचा पाठपुरावा करणे.<br>कामगार कल्याण निधी योजनेची पूर्ण अंमलबजावणी करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | बचत संलग्न गटविमा योजना पूर्ण अंमलबजावणी व जीवन विमा निगमशी समन्वय राखणे.<br>१४ कामगार संघटनेशी समन्वय साधून औद्योगिक शांतता राखणे.<br>कामगार प्रशिक्षण व सेवकांचे विविध प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे.<br>विविध कल्याणकारी योजना राबविणे.<br>आपत्कालीन निधी संकलन व प्रदान करणे.<br>कल्याणवार्ता मासिक दरमहा प्रकाशित करणे. |
| २. | अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये | १) सल्लागार (कामगार) हे खातेप्रमुख संवर्गातील पद असून महापालिकेतील इतर खातेप्रमुखांप्रमाणे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे. सल्लागार (कामगार) कार्यालयाकडील सर्व कामांचे पर्यवेक्षण, प्रकरणी निर्णय, विविध योजनांची अंमलबजावणी, न्यायालयीन प्रकरणांची पूर्तता, मार्गदर्शन इत्यादी कर्तव्ये पार पाडावी लागतात.<br>२) मा.सल्लागार (कामगार) यांना दैनंदिन कामकाजात सहाय्य करण्यासाठी वर्ग २ मध्ये कामगार कल्याणाधिकारी हुद्याची २ (दोन) पदे आहेत. त्यांच्यामध्ये महापालिकेतील विविध ४० विभाग व अन्य सर्व कार्यालयातीन कामांची विभागणी करुन देण्यात आली आहे. |
| ३. व ४. | अवलंबिली जाणारी कार्यपध्दती, पर्यवेक्षण व जबाबदारी निश्चिती करणे आणि कर्तव्ये पार पाडण्यांसाठी विहत केलेले निकष | १) विविध खात्याकडून विधी विषयक मार्गदर्शन/अंमलबजावणी, वारस पध्दती नेमणुक, (लाड समिती/दि.२५.०७.१९८५ करार) गटविमा, इन्डिंमेटी बाँड, जादा कामाचे वेतन, कामगार कल्याण निधी, इत्यादीच्या अनुषंगाने सादर होणारी प्रकरणे ज्यु.ग्रेड लेखनिक, सि.ग्रेड लेखनिक यांचेमार्फत प्राथमिक स्तरावर छाननी व अहवाल तयार करुन सादर केली जातात. कामगार कल्याणाधिकारी स्तरावर सखोल छाननी व प्राथमिक स्तरावर पर्यवेक्षण केले जाते. अंतिमत: खातेप्रमुख सल्लागार (कामगार) यांचेमार्फत सक्षम प्राधिकाऱ्याकडे प्रकरणे मान्यतेसाठी सादर केली जातात. संपूर्ण छाननी व निर्णय प्रक्रियेची अंमलबजावणी प्रचलित कार्यपध्दती व प्रस्थापित यंत्रणेद्वारे केली जाते. त्यामुळे प्राथमिक छाननी व पर्यवेक्षणाबाबत वैयक्तिक तसेच सामूहिक जबाबदारी रहाते. |
| ५. | नियम, उपनियम, नियम पुस्तिका, अभिलेख इत्यादी बाबत. | १) विविध औद्योगिक व कामगार कायदे व या कायद्यांन्वये करण्यांत आलेले नियम.<br>२) वारस नियुक्ती प्रकरणी दि.२४.११.७६ रोजी पुणे मनपा कामगार या मान्यताप्राप्त कागार संघटनेबरोबर करण्यांत आलेल्या करार व शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येते. (कार्यपध्दती व नियम परिशिष्ट (अ) मध्ये नमूद केले आहेत.)<br>३) कामगार कल्याण निधी २००५ ची स्वतंत्र शासनमान्य नियमावली आहे. निधीच्या कार्यकारी समितीची रचना, संक्षिप्त कल्पना, देण्यात येणारे अर्थसहाय्य व याबाबत परिशिष्ट (ब) मध्ये तपशिल दिला आहे.<br>४) पुणे मनपा कामगार युनियन व मनपा प्रशासन यांचेमध्ये वेळोवेळी झालेल्या विविध करारांचा संक्षिप्त तपशिल परिशिष्ट (क) मध्ये नमूद केला आहे.<br>५) सन १९८५ च्या कराराप्रमाणे करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा व तरतुदींचा संक्षिप्त तपशिल परिशिष्ट (ड) मध्ये नमूद केला आहे.<br>६) केंद्रिय कामगार प्रशिक्षण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वानुसार मनपा सेवकांसाठी मा.स्थायी समिती ठ.क्र.५४७, दि.१०.८.०४ व क्र.६८८ दि.११.८.०५ ठरावानुसार कामगार प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यांत येते. |

| | | |
|---|---|---|
| | | ७) महापालिकेतील चतुथश्रेणीतील सेवकांसाठी दि.१.४.१९९५ पासून कार्यरत असलेली गटविमा योजना आयुर्विमा महामंडळाने दिनांक १०/४/०६ पासून विखंडित केली आहे.<br>८) मा.स्थायी समिती ठ.क्र.८१६, दि. २.११.२००४ अन्वये महापालिकेच्या सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांसाठी दरमहा सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यांत येतो. त्यामध्ये सर्व संवर्गातील सेवकांना शाल, स्मृतिचिन्हे व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यांत येते. |
| ६. | धोरण ठरविणे व अंमलबजावणी–नागरिकांसाठी उपलब्ध यंत्रणा | १) दैनंदिन कामकाज व मान्य धोरणाच्या अंमलबजावणीकामी नागरिकांची गाऱ्हाणी ऐकून घेण्यांसाठी दररोज दु ३ ते ५ या वेळेत नागरिकांसाठी वेळ राखून ठेवण्यांत आला आहे.<br>२) नविन नियम वा धोरण ठरविताना अधिनियमातील तरतूदीनुसार सर्व संबंधित नागरिकांकडून सूचना व हरकती मागविण्यांत येऊन अंतिम निर्णय मे.राज्यशासनाच्या मान्यतेने घेतले जातात.<br>३) दि. १/२/०७ पासून सेवक, निवृत्त सेवक, कंत्राटदार व नागरिक यांना मार्गदर्शन करणेकामी पुणे मनपा भवन, दक्षिण प्रभाग जिन्याखालील जागेत सुविधा केद्र सुरु करण्यात आले आहे. |
| ७. | बैठका व इतिवृत्ते | १)पुणे मनपा कामगार युनियन या मान्यताप्राप्त संघटनेसमवेत आयोजित केल्या जाणाऱ्या मासिक संयुक्त कामगार बैठकांचे इतिवृत्ते तयार केली जातात. तथापि सदर इतिवृत्ते मनपा प्रशासन व संघटना यांच्याशीच संबंधित असल्याने त्यांनाच उपलब्ध करुन देण्यांत येतात.<br>२)कामगार कल्याण निधीच्या कार्यकारी समितीच्या व्दैमासिक बैठकीचे इतिवृत्ते कार्यकारिणीच्या सदस्यांना उपलब्ध करुन देण्यांत येतात. |
| ८. | अधिकाऱ्यांची सूचि | १) मा.नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार)<br>पत्ता – बी–१, हनुमाननगर, पुणे मनपा वसाहत, पुणे १६.<br>फोन नं. २५६५६८७०.<br>२) श्री.दौंडकर शिवाजी, कामगार कल्याण अधिकारी,<br>पत्ता – बी–१५, सांयतारा सोसायटी, सदाशिवपेठ, पुणे–३०<br>फोन नं. २४३३६९९२<br>३) श्री.अरुण खिलारी, कामगार कल्याण अधिकारी,<br>पत्ता विजयश्री टॉवर्स, फ्लॅट क्र.ए–४२, दत्तवाडी, पुणे–३०<br>फोन नं. २४३२९४८२ |
| ९. | कर्मचारी/अधिकारी यांचे मासिक वेतन व नुकसानभरपाई रक्कम | अ)माहे जानेवारी २००८ पेड इन माहे फेब्रुवारी २००८ चे १२ सेवकांचे मासिक वेतन रक्कम रु.१५५८०७.५८ आहे.<br>ब)सन २००७–०८ या वर्षात २ सेवकांना नुकसान भरपाई देण्यांत आलेली आहे. |
| १० | अंदाजपत्रकीय आर्थिक तरतूद | अ)सेवकवर्ग – रु. २,०९२,०००/–<br>ब) कामगार प्रशिक्षण वर्ग रु. १०,००,०००/–<br>क) सेवापूर्ती समारंभ – रु. ३,००,०००/–<br>ड)खातेनिहाय परिक्षा – रु.२५००/–<br>इ) संकिर्ण रु.३,००,०००/–<br>ई) कामगार कल्याण निधी मनपा वर्गणी – रु. २०,००,०००/– |

| | | |
|---|---|---|
| ११ | अनुदानित योजना , लाभार्थी व होणारा खर्च | केंद्र वा राज्य शासनाकडून अनुदान मिळणारी कोणतीही योजना या कार्यालयाकडून राबविण्यांत येत नाही. |
| १२. | लाभार्थींना देण्यांत येणाऱ्या सवलती, परमिट, इत्यादि | कामगार कल्याण निधी योजनेतून मृत सेवकांच्या वारसांना रक्कम रु. १५,०००/- अनुदान देण्यात येते. याशिवाय कामगारांच्या पाल्यांच्या उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक कर्ज शिष्यवृत्ती रु. १२,०००/-विना व्याज देण्यात येते. |
| १३ | इलेक्टॉनिक तंत्राव्दारे माहिती उपलब्ध आहे काय? | नाही |
| १४ | नागरिकांसाठी वाचनालय, अभ्यासकक्ष सुविधा उपलब्ध आहे काय? | नाही |
| १५ | शासकिय माहिती अधिकाऱ्यांचे नाव, हुद्दा, इत्यादि तपशिल | अपिलीय प्राधिकारी - मा.श्री.नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार)<br>जन माहिती अधिकारी - श्री.शिवाजी दौंडकर, कामगार कल्याणाधिकारी<br>सहाय्यक जन माहिती अधिकारी - सौ. ज्योती भोसले, लघुटंकलेखिका. |
| १६ | इतर माहिती | नाही |
| (क) | नागरिकांवर परिणाम करणारे निर्णय वा धोरणे प्रसिध्द करणे | नागरिकांवर परिणाम करणारे निर्णय व धोरणे निश्‍चित केल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार प्रसिध्दीची कार्यवाही करण्यात येते. |
| (ड) | प्रशासकिय व निमन्यायीक निर्णयांची कारणमिमांसा बाधित व्यक्तींना देणे. | बाधित व्यक्तींना माहिती व मार्गदर्शन देण्याची व्यवस्था स्वतंत्र सुविधा केंद्रामार्फत करण्यात आली आहे. सुविधा केंद्राचे वेळापत्रक परिशिष्ट ई मध्ये नमूद आहे. |

## परिशिष्ट – अ
## वारस नियुक्ती – सर्व साधारण नियम

मेहतर व सफाई कर्मचाऱ्यांचा सामाजिक दर्जा वाढविण्यांसाठी व त्यांच्या अडीअडचणी दूर करण्यांसठी करावयाच्या उपाययोजनाबाबत शासनाने मा.लाड यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित केली होती. या समितीने सादर केलेल्या शिफारसी महाराष्ट्र शासनाने दिनांक १२.८.१९७५ रोजी स्विकृत केल्या. या शिफारसीपैकी सफाई कामगार जर सेवानिवृत्त, मयत वा शारिरीकदृष्टया अपात्र झाल्यास त्यांच्या वारसांना त्यांच्या जागेवर नोकरी देण्याची महत्वपूर्ण शिफारस मा. लाड कमिटीने केली आहे.

मा.लाड कमिटीने केलेल्या शिफारसीच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिका कामगार युनियन व महापालिका प्रशासन यांच्यामध्ये दिनांक २४.११.७६ रोजी करार करण्यांत आला. या करारामध्ये दिनांक २.२.१९८७ रोजी काही दुरुस्त्या करण्यांत आल्या.

लाड कमिटीच्या शिफारसीच्या अंमलबजावणीबाबत शासनाने दिनांक ५.११.१९९२, १२.१.१९९४, ३०.६.१९९४ व १.१०.२००३ शासन परिपत्रक निर्गमित करुन सूचना दिल्या आहेत.

घाणभत्ता नियुक्तीचे विविध निकष खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | ज्या पदावरील सेवकाचे वारसास नियुक्ती करावयाची ती विहित पदे | मेहरतर/मेहतराणी, झाडूवाला/झाडूवाली, कचरा डेपो बिगारी (स्त्री/पुरुष), फिलर, कुंडीवाला, ड्रेनेज बिगारी, गटार बिगारी, घाणभत्ता अनुज्ञेय असणारे सेवक. |
| २ | नियुक्ती पात्र विहित वारस (३०.६.१९९४) | १.पती/पत्नी २. मुलगा/सून ३.अविवाहित मुलगी ४.विधवा /घटस्फोटित मुलगी, ५. विधवा/घटस्फोटित बहिण ६.वरीलपैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास त्यांचा सांभाळ करण्याची लेखी हमी घेणारी जवळची नातेवाईक किंवा नामनिर्देशित व्यक्ती. |
| ३ | वारस उमेद्वाराची विहित वयोमर्यादा | किमान १८ वर्षे पूर्ण कमाल ४५ वर्षापर्यंत |
| ४ | विहित अर्ज करण्याची मुदत | १ वर्ष. |
| ५ | इतर निकष | १.दत्तक विधान निवृत्तीपूर्वी ६ महिने अगोदर असावे.<br>२.सफाई कामगार निवृत्त झाल्यास अगर सेवेत असताना दिवंगत झाल्यास, क्षयरोग, कर्मरोग यासारख्या गंभीर आजारामुळे किंवा मानसिक अगर शारिरीक दोषामुळे वैद्यकिय कारणास्तव २० वर्षाच्या सेवेनंतर सेवानिवृत्त व्हावे लागल्यास अशा कर्मचाऱ्याच्या पात्र वारस व्यक्तीस नोकरी द्यावी.<br>३.वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात रहात असणे आवश्यक आहे.<br>४.सफाई कामगार नोकरी करीत असताना त्याला चतुर्थ श्रेणीतच पदोन्नती मिळाल्यास वारस हक्काच्या नियमास बाधा येणार नाही.<br>५.शासनाच्या प्रचलित धोरणासनुसार किमान २० वर्षे सेवा होणे आवश्यक आहे.<br>६.नोकरीतून कमी केले, स्वच्छेने राजीनामा दिला, पदौन्नती मिळून तृतीय श्रेणीत गेले अशा सेवकांना वारस पध्दत लागू होणार नाही. |

**परिशिष्ट – ब**

**कामगार कल्याण निधी २००५**

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ९१, ४५४ व ४५७ (५) चे तरतुदीनुसार महापालिकेने तयार केलेल्या कामगार कल्याण निधीस मे.राज्य शासनाने शासन निर्णय क्र.पीएमसी–३०२००३/ २४६२ सीआर २११/०३, नवि–२२ अन्वये मान्यता दिली आहे.

सदर कामगार कल्याण निधी पुणे महापालिका सेवकांसाठी दिनांक १ ऑक्टोबर २००५ पासून अंमलात आला आहे.

या कामगार कल्याण निधीसाठी महापालिका सेवकांकडून वार्षिक रु.१००/– प्रमाणे वर्गणी वेतनातून कपात करण्यांत येणार असून तितकाच वाटा महापालिका प्रशासन उपलब्ध करुन देणार आहे.

या निधीच्या अंमलबजावणीसाठी विहित नियमानुसार खालीलप्रमाणे कार्यकारी समिती गठित करण्यांत आली आहे.

| क्र | हुद्दा | | नियमातील तरतूद | | प्रस्तावित |
|---|---|---|---|---|---|
| १ | पदसिध्द अध्यक्ष | : | मा. महापालिका आयुक्त किंवा त्यांनी नियुक्त केलेला अधिकारी | : | मा. प्रवीणसिंह परदेशी (भाप्रसे) |
| २ | पदसिध्द कार्यकारी अध्यक्ष | : | मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त(ज) | : | मा. सुधीर खानापुरे |
| ३ | पदसिध्द खजिनदार | : | मुख्य लेखापाल | : | मा. अंबरिश गालिंदे |
| ४ | सचिव | : | सल्लागार(कामगार) | : | मा.नंदकिशोर जगताप |
| ५ | सभासद | : | मा. आयुक्त यांनी नियुक्त केलेला वर्ग १ मधील १ अधिकारी | : | श्री. ज्ञानेश्वर मोळक, महापालिका सहायक आयुक्त (विका क्र.३) |
| ६ | सभासद | : | मा. आयुक्त यांनी नियुक्त केलेला वर्ग २ मधील १ अधिकारी | : | डॉ. संजीव शिवाजीराव वावरे, क्षेत्रीय वैद्यकिय अधिकारी, घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय. |
| ७ | सभासद | : | मा. आयुक्त यांनी नियुक्त केलेला वर्ग ३ मधील २ अधिकारी | : | (१) श्री.वाबळे लीलाधर प्रभाकर, सिग्रले, आयातकर कार्यालय.<br>(२) श्रीमती वर्षा कुलकर्णी, कनिष्ट अभियंता बीओटी सेल. |
| ८ | सभासद | : | मा. आयुक्त यांनी नियुक्त केलेला वर्ग ४ मधील ३ अधिकारी | : | (१) श्री.तुकाराम सादबा कदम, मोकादम, बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय.<br>(२) श्रीमती उषा आल्हाट, बिगारी, पथ कार्यालय<br>(३) सौ. सारीका मोझे, आया, कमला नेहरु रुग्णालय. |
| ९ | सभासद | : | मान्यता प्राप्त कामगार संघटनेचा १ प्रतिनिधी | : | श्रीमती मुक्ता मनाहेर, सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन (मान्यताप्राप्त) |

सदर कामगार कल्याण निधीमधून

(१) सेवेत असताना सेवक मयत झाल्यास त्याच्या कुटुंबियांना रु.१५,०००/–

(२) सेवेत असताना अपघात झाल्यास व ५०% अपंगत्व आल्यास रु.१५,०००/-
(३)दरवर्षी २० गुणवंत कामगार पुरस्कार
(४) शैक्षणिक शिष्यवृत्ती रु.१२,०००/- यासाठी अर्थसहाय्य देण्यांत येणार असून विविध कल्याणकारी उपक्रम राबविण्यांत येत आहेत.
(५) सेवकांमधील कलागुणांना वाव देण्यासाठी प्रतिवर्षी विविध क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

## परिशिष्ट – क

## <u>पुणे मनपा कामगार युनियन व पुणे महानगरपालिका यांचेमधील करार</u>

| अ.क्र. | कराराची तारीख | विषय |
|---|---|---|
| १ | ०६.०७.१९५६ | गणवेष, पगारी रजा, सणांच्या सुट्टया, इत्यादीबाबत. |
| २ | १४.०५.१९६६ | केंद्रशासनाने महागाई भत्ता व बी एरिया अलौन्स् देणे. |
| ३ | ०६.०६.१९६८ | सेवाजेष्ठतेप्रमाणे कायम जागांवर नेमणूका, कसबी जागांवर निमकसबी सेवकांतून नेमणूका करणे, नविन कामगार भरती कामगार कल्याण अधिकारी यांचेमार्फत करणे. |
| ४ | ११.०६.१९६८ | जलोत्सारण विभागातील सेवकांच्या मागण्यांबाबत.(नोटीस दि.११.६.१९६८) |
| ५ | १२.०७.१९६८ | फायर ब्रिगेड विभागातील सेवकांच्या मागण्यांबाबत. .(नोटीस दि.१२.७.१९६८) |
| ६ | २८.०१.१९६९ | बत्ती विभागातील सेवकांच्या मागण्यांबाबत. |
| ६ | २२.०९.१९६९ | रोजंदारी सेवकांना कायम जागांवर नेमणे. |
| ७ | २४.११.१९७१ | पाटणकर अॅवॉर्ड– कायम करणे व सेवाशर्ती सुधारणा. |
| ८ | २४.११.१९७६ | आरोग्य खात्यातील सफाई सेवकांच्या वारस नियुक्तीबाबत. |
| ९ | ०९.०३.१९७८ | केंद्र सरकारच्या दराने महापालिका सेवकांना महागाई भत्तात देणे. |
| १० | ३०.०५.१९८४ | बदली सेवकांना कायम जागांवर नेमणूका देणे. |
| ११ | ०७.०३.१९८५ | आरोग्य खात्याकडील २४० बदली बिगारी सेवकांना कायम जागांवर नेमणूका देणे. |
| १२ | २५.०७.१९८५ | सेवानिवृत्ती सेवकांच्या कुटुंबातील एका पात्र व्यक्तीस मनपा सेवेत प्राधान्य देणे. |
| १३ | २५.१०.१९८८ | सन १९८८–८९ ते १९९०–९१ या वर्षात सानुग्रह अनुदान आदा करणे. |
| १४ | ३१.०७.१९८९ | कचरा वाहतुक मदत खेपांचे दरात वाढ करणे. |
| १५ | १०.०८.१९८९ | लष्कर पाणीपुरवठा केंद्रे व त्या केंद्रांतील सेवकांचे मनपाकडे हस्तांतरण करणे. |
| १६ | ०५.१०.१९९१ | सन १९९०–९१ ते १९९२ –९३ या वर्षात सानुग्रह अनुदान आदा करणे. |
| १७ | ०५.११.१९९२ | दैनिक वेतन व वेतनश्रेणी सुधारणा करणे.(पोवार अॅवॉर्ड) |
| १८ | ११.१०.१९९४ | सन १९९३–९४, ते १९९५–९६ वर्षात सानुग्रह अनुदान आदा करणे. |
| १८ | २८.१२.१९९९ | दि. १.११.९९ पासून सफाई सेवकांना साबण, गमबूट व गॉगल्स् पुरविणे. |
| १९ | २३.१०.१९९७ | सन १९९६–९७, ते १९९८–९९ वर्षात सानुग्रह अनुदान देणे. |
| २० | २४.१०.२००० | सन १९९९–२००० वर्षात सानुग्रह अनुदान देणे. |
| २१ | २१.१२.२००१ | सन २०००–२००१ वर्षात सानुग्रह अनुदान देणे. |
| २२ | १९.०५.२००३ | सन २००१–२००२ वर्षात सानुग्रह अनुदान देणे. |
| २३ | ६–१०–२००५ | सन २००२–०३ ते २००४–०५ वर्षात सानुग्रह अनुदान देणे. |

## परिशिष्ट ड

## सन १९८५ करार

पुणे महानगरपालिकेच्या सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकाच्या वारसास भरतीप्रसंगी प्राधान्य देणेकामी पुणे मनपा कामगार युनियन (मान्यताप्राप्त) व पुणे मनपा प्रशासनामध्ये दिनांक २५.०७.१९८५ रोजी करार करण्यांत आला.

महापालिकेच्या कोणत्याही श्रेणीतील सेवक सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या एका पात्र वारसास मनपाच्या चतुर्थश्रेणीतील सेवाभरती प्रसंगी प्राधान्य देण्यांचे धोरण सदर करारान्वये उभयमान्य करण्यांत आले आहे.

**यासाठी पात्र वारस –**

पती/पत्नी, मुलगा/अविवाहित मुलगी, दत्तक पुत्र, एकुलता एक मुलगा मृत झाल्यास सून.

वरील करारातील अटी व शर्तीनुसार कार्यवाही करण्यांत येत आहे.

## परिशिष्ट ई

| क्र. | वार | वेळ | विषय |
|---|---|---|---|
| १. | सोमवार | स. ११.०० ते दु. २.०० | गटविमा प्रकरणे |
| २. | मंगळवार | स.११.०० ते दु. २.०० | वारस नेमणुका |
| ३. | बुधवार | स.११.०० ते दु. ५.०० | पेन्शन, तोषदान, व गुंतवणूक |
| ४. | गुरुवार | स.११.०० ते दु. २.०० | कंत्राटी कामगार कायदा व कामगार विमा |
| ५. | शुक्रवार | स.११.०० ते दु. २.०० | कामगार कल्याण निधी |
| ६. | शनिवार | स.११.०० ते दु. २.०० | कामगार व कामगार संघटनांचे प्रश्न |

**इतर उपक्रम :**

- पुणे महानगरपालिकेतील मनुष्यबळाचा पर्याप्त करणे, व त्यासाठी उपाययोजना सुचविणेकामी सल्लागार (कामगार) कार्यालयाच्या नियंत्रणाखाली स्वतंत्र मनुष्यबळ विकास कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाच्या कामकाजाची व्याप्ती/स्वरुप अतिव्याप्त असून, सद्यस्थितीत कर्मचाऱ्याचे सर्वेक्षण करणे आणि गरजेनुरुप व सातत्याने प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे या बाबींपुरती या कक्षाची सीमा निश्चित करण्यात आली आहे.
- कामगार क्षेत्रात होणाऱ्या घडामोडी, कामगारांचे विचार आणि कामगारांनी केलेल्या विशेष कामगिरीस प्रसिध्दी देणे या हेतूने कामगारांचे मुखपृष्ठ म्हणून दरमहा सल्लागार (कामगार) कार्यालयाकडून कल्याणवार्ता मासिक प्रकाशित करण्यात येते. या मासिकाचे दरमहाचे अंक पुणे महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.